# ४. वारांचे गाणे

7ZDGJH

- ऐका व म्हणा.



गाणी, गप्पा-गोष्टींचा,
सोमवार आमच्या आवडीचा.
कृतीतून परिसर शिकण्याचा,
मंगळवार असे निरीक्षणाचा.
कागद, माती, विविध रंग,
बुधवारी आम्ही त्यातच दंग.
भाषणासाठी जितू उभा,
गुरुवारी जमली बालसभा.
पाने, फुले, जंगल सफरी,
सहलीला जाऊ शुक्रवारी.
खेळण्यात आनंद वाटे भारी,
कवायत आमची शनिवारी.
शाळेला सुट्टी रविवारी,
मित्र येती खेळायला घरी.

- वारांची नावे ऐका. म्हणा.
- वारांची नावे कवितेच्या क्रमाने सांगा. नावांच्या शब्दपट्ट्या क्रमाने लावा.
- गुरुवारच्या आधीचा व नंतरचा वार कोणता ?
- शब्दपट्ट्यांवरील वारांची नावे वाचा. प्रत्येक नावाच्या शेवटी कोणता उच्चार येतो ते सांगा. त्या उच्चाराचे अक्षर दाखवा.
- मराठी दिनदर्शिकेवर वारांची नावे दाखवा. वाचा.
- पाचअक्षरी वाराचे नाव सांगा.
- शाळेतील तुमच्या आवडीचा तास कोणत्या विषयाचा ? तो का आवडतो, ते सांगा.

**शिक्षकांसाठी :** १. गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. विद्यार्थ्यांना मागे म्हणण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना स्वतःच्या सोबत गाणे म्हणण्यास सांगावे. वारांच्या नावांच्या शब्दपट्ट्या मोठ्या अक्षरांत करून घ्याव्या. सात विद्यार्थ्यांना गोलाकार उभे करावे. प्रत्येकाकडे वाराच्या नावाची पट्टी द्यावी. एका वाराच्या ओळी एका विद्यार्थ्याला, याप्रमाणे क्रमाक्रमाने गाणे म्हणण्यास सांगावे. २. वर्गात रोजचा वार, दिनांक, दिनविशेष सांगावा, तसेच दिनदर्शिकेत तो वार, दिनांक दाखवावा. रोजचा वार व दिनांक सांगण्याची, तसेच दिनदर्शिकेत दाखवण्याची विद्यार्थ्यांना सवय लावावी.